पुढारी पा.नं.३.

# कारटेप चोरी करणाऱ्या आरोपींना अटक

## १० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

विरार व इतर पोलीस ठाणे हद्दीत महागडया कारचे म्युझिक सिस्टीम, टेप चोरी करणाऱ्या तीन आरोपींना गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांनी अटक केली असून त्यांच्याकडून एक आय १० कार, एक स्विफ्ट कार व चोरी केलेले २० म्युझिक सिस्टीम, कारटेप असा १० लाख ३२ हजार १६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींवर विविध पोलीस ठाण्यात १५ गुन्हे केल्याचे उघडकीस आणले आहे.

देवेंद्र खेमराज जैन यांनी त्यांची करार श्रमसाफल्य बिल्डींग, विर सावरकर रोड, विरार पूर्व येथे उभी केली असता कोणीतरी त्यांच्या गाडीची काच तोडून कारमधील टोयोटो कंपनीचा कारटेप चोरी करून नेला होता. त्याबाबत विरार पोलीस ठाण्यात भा.द.वि.सं. कलम ३७९, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून महागड्या कारचे काच फोडुन म्युझिक सिस्टीम, कार टेप चोरीच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ झाली असून कारटेप चोरी करणारी टोळी सक्रीय झाली होती. या घटनांची वरिष्ठांनी गांभियनि दखल घेवुन गुह्यांना आळा घालण्यासाठी तसेच दाखल गुन्ह्यांचा तपास करून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखा कक्ष ३ विरार यांच्याकडे वर्ग करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करून जुबेर रईस अहमद, शहनवाज मोहम्मद अलियार खान दोन्ही रा तळोजा, नवी मुंबईन, परवेज इकबाल सैय्यद, रा. कुर्ला कपाडीया नगर, सी.एस.टी. रोड, कुर्ला (पश्चिम) मुंबई येथून अटक करण्यात आली. या आरोपीकडून गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेली एक आय १० कार, एक स्विफ्ट कार व चोरी केले २० म्युझिक सिस्टीम, कारटेप असा १०,३२,१६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या आरोपींवर विरार पोलीस ठाणे ६, तुळींज पोलीस ठाणे १, आचोळे पोलीस ठाणे २, माणिकपूर पोलीस ठाणे २, अर्नाळा सागरी पोलीस ठाणे १, नयानगर पोलीस ठाणे १, काशिमीरा पोलीस ठाणे १, विठ्ठलवाडी पोलीस ठाणे १ अशा विविध पोलीस ठाण्यात १५ गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. तसेच आरोपी जुबेर रईस अहमद हा कारटेप चोरीचा सराईत आरोपीं असुन त्याच्यावर कर्नाटक, गोवा, महाराष्ट्र मधील विविध ठिकाणी ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत.

पुण्यनगरी पृ.५/१.

# सोमय्या, विकास वालकर यांनी घेतली पोलीस आयुक्तांची भेट



## श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरण

**मीरा रोड :** भाजप नेते किरीट सोमय्या व श्रद्धाचे वडील विकास वालकर यांनी शुक्रवारी सकाळी मीरा-भाईंदर, वसई-विरारचे नवनियुक्त पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणी भेट घेतली. वसई येथे राहणाऱ्या श्रद्धा वालकर हिची दिल्ली येथे हत्या करण्यात आली. या हत्याकांडानंतर देशभर खळबळ उडाली आहे. त्याचा तपास दिल्ली पोलीस व वसई पोलीस करत आहेत. याचा तपास जलदगतीने होऊन आरोपीला शिक्षा व्हावी, यासाठी भाजप नेते किरीट सोमय्या व श्रद्धाचे वडील विकास वालकर यांनी शुक्रवारी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची भेट घेतली.

जवळपास एक ते दीड तास पोलीस आयुक्त पांडे यांच्यासोबत चर्चा सुरू होती. वालकर प्रकरणात दिल्ली पोलिसांना देखील भेटणार असून श्रद्धाला न्याय मिळवून देणार असल्याचे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सांगितले. श्रद्धाचे वडील विकास वालकर यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीदेखील भेट घेतली होती. त्यांनतर श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणाच्या तपासाला वेग आला आहे. पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची भेट घेत त्यांना या प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करण्यात आली असून आता डीएनए रिपोर्ट देखील मॅच झाला असल्याने मोठा पुरावा मानला जात असल्याने कारवाई करण्यास खूप मदत होणार असल्याचे वालकर यांनी सांगितले. तसेच आफताब याने जामीन मिळावा, यासाठी न्यायालयात अर्ज केला आहे. त्यावर दिल्ली पोलीस हरकत घेणार असल्याचे पोलीस आयुक्त यांनी सांगितले. पोलीस आयुक्त पांडे यांनी आयुक्त पदाचा दोन दिवसांपूर्वी पदभार घेतला असल्यामुळे या घटनेची सर्व माहिती घेऊन अहवाल तयार केला जाईल. तसेच ज्यांनी कोणी या केसमध्ये हलगर्जीपणा केला असेल, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. श्रद्धा वालकर हत्याकांड प्रकरणात लवकरात लवकर कारवाई करून न्याय मिळवून दिला जाईल, असे पोलीस आयुक्त पांडे यांनी आश्वासन दिल्याचे वालकर यांनी सांगितले आहे.

लोकमत पा.नं.५.

# मुंबईत आज 'मोर्चा विरुद्ध मोर्चा'

## आघाडीचा हल्लाबोल, तर भाजपचे 'माफी मांगो' आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईत शनिवारी निघणाऱ्या दोन मोर्चांनी राजकीय वातावरण तापणार आहे. महाविकास आघाडीचा शिंदे-फडणवीस सरकारला टार्गेट करणारा हल्लाबोल मोर्चा एकीकडे, तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी भाजपकडून माफी मांगो आंदोलन केले जाणार आहे.

हल्लाबोल मोर्चातून महाविकास आघाडी शक्तिप्रदर्शन करणार आहे. महापुरुषांचा अवमान, सीमाप्रश्न, महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांसाठी हा मोर्चा निघणार असून पोलिसांनी काही अटी शर्थींसह परवानगी दिली आहे.

### भाजपही उतरणार रस्त्यावर

महाविकास आघाडीच्या मोर्चाला प्रत्युत्तर म्हणून मुंबईभर 'माफी मांगो' आंदोलन करण्याची घोषणा भाजपने केली आहे. भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी शुक्रवारी या आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनात जागोजागी 'उद्धव ठाकरे माफी मागा, नाना पटोले माफी मागा, अजित पवार माफी मागा,' असे फलक झळकावण्यात येणार आहेत. तसेच काळे झेंडे दाखवत महाविकास आघाडीचा निषेध करण्यात येईल, असे शेलार यांनी सांगितले.

### ड्रोनद्वारे ठेवणार लक्ष

या मोर्चासाठी दोन ते अडीच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. राज्य राखीव पोलिस दलाच्या वाढीव तुकड्याही तैनात असतील. ड्रोनच्या माध्यमातून पोलिस मोर्चावर लक्ष ठेवणार आहेत.

मोर्चा शांततेत व्हावा, त्याला परवानगी दिलेली आहे. लोकशाही पद्धतीने कोणाला विरोध करायचा असेल तर ते करतील. कायदा आणि सुव्यवस्था कायम राहावी, एवढ्यापुरता सरकारचा त्यात हस्तक्षेप असेल.

\- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

म.टा-पु-पा.१.

# १५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका रविवारी

म. टा. वृत्तसेवा, वसई



वसई तालुक्यातील १५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका १८ डिसेंबरला होत आहेत. या निवडणुकांसाठी सध्या प्रशासन सज्ज झाले आहे. एकूण ५५ मतदान केंद्रांवर सकाळी ७.३० ते ५ या वेळेत मतदान होणार असून यासाठी ३८५ महसूल कर्मचारी अधिकारी काम करणार आहेत.

वसईतील या १५ ग्रामपंचायतींमध्ये एकूण १४१ सदस्य आणि १५ सरपंच पदांसाठी ही निवडणूक होत आहे. यातील १६ सदस्य हे बिनविरोध निवडून आले आहेत, तर एका जागेवर उमेदवारी अर्ज आलेला नाही. त्यामुळे १२४ सदस्यांच्या जागांसाठी मतदान होणार आहे.

या निवडणुकीत सत्तारूढ बहुजन विकास आघाडीच्या विरोधात सर्व विरोधी पक्ष एकत्र झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे, राज्यातील सत्तेसाठी शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर शिवसेनेचे दोन्ही गट एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले असताना, वसईमध्ये मात्र हे दोन्ही गट भाजप आणि काँग्रेससह एकत्र येत निवडणूक लढवत आहेत. त्यामुळे हा चर्चेचा विषय झाला आहे.

लोकसत्ता पा. नं. १४.

# हरकतींसाठी केवळ सहा दिवस

## बुलेट ट्रेनसाठी वृक्षांच्या कत्तलींविरोधात पर्यावरणप्रेमी आक्रमक

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी वसई, विरारमधील १ हजारांहून अधिक वृक्ष कापली जाणार असून त्यावर हरकत घेण्यासाठी केवळ ६ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. नागरिकांना अंधारात ठेवून वृक्षांची कत्तल करण्याचे हे षडयंत्र असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी संघटनांनी केला आहे. याविरोधात निर्भय जनमंचने व्यापक आंदोलनाचा इशारा दिला आहे.

प्रकल्प वसई विरारच्या भागातून जात आहे. या प्रकल्पात गोखीवरे, बिलालपाडा, मोरे गाव, ससूनवघर या गावातील १ हजार ३६८ झाडे यात बाधित होत आहेत. यामध्ये अगस्त, ऐन, आंबा, आपटा, बाबूल, बेल, अमाती, बेहडा, भेंड, चिंच, चारकोल, बदाम, बोर, कडूनिंब, जांभूळ, आवळा, काजू, काकड, खैर, निलगिरी, पिंपळ, खजूर, कांचन, काळा उंबर, सुबाभूळ, सुपारी, ताड, नारळ, सोनमोहर अशा विविध प्रजातीच्या वृक्षाचा समावेश आहे. या होत असलेल्या वृक्षतोडीच्या संदर्भात वृक्षप्राधिकरण विभागाने जाहिरात प्रसिद्ध करून हरकती, सूचना मागविल्या आहेत. या वृक्षतोडी संदर्भातील जाहीर नोटीस ७ डिसेंबरला प्रसिद्ध केली आणि केवळ ६ दिवसांत हरकती नोंदविण्याची मुदत दिली. हरकत घेण्यासाठी किमान एक महिन्यांची मुदत देण्यात येते. त्याची व्यापक प्रसिद्धी होते. मात्र जनतेला अंधारात ठेवून वृक्षतोड करायची असल्याने शासनाने केवळ ६ दिवसांची मुदत दिली आहे, असा आरोप निर्भय जनमंचचे मनवेल तुस्कानो यांनी केला आहे. केवळ एकदोन वर्तमानपत्रांत यासंदर्भात छोटी जाहिरात देण्यात आली होती. तीदेखील आम्हाला वर्तमानपत्रातील बातम्यांमधून समजले आहे. या वृक्षतोडीविरोधात जनता दल, निर्भय जनमंच, वसई पर्यावरण संवर्धक समितीने हरकती दाखल केल्या आहेत

### 'वृक्ष लागवड ही धूळफेक'



वृक्षतोड केल्यानंतर त्या बदल्यात दुसरी वृक्ष लावली जातील असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे. मात्र हे केवळ गाजर दाखविण्याचा प्रकार आहे, असा आरोप तुस्कानो यांनी केला आहे. या मार्गावरील वृक्ष २० ते २५ वर्ष जुने आहेत. त्याची भरपाई होऊ शकत नाही. ग्रामीण भागात मूळची वृक्ष संपदा आहे. तेथे झाडे लावून वाढल्याचे दिसत नाही. आजवर ज्या ज्या प्रकल्पासाठी झाडे कापली त्या मोबदल्यात जेथे वृक्ष लावण्यात आली त्याचे तपशील सादर झालेले नाहीत. त्यामुळे वृक्ष कापून त्या बदल्यात अन्य ठिकाणी वृक्ष लावणे ही धूळफेक असल्याचेही तुस्कानो यांनी सांगितले.

लोकसत्ता पा. नं. १४.

# अनधिकृत जाहिरात फलकांविरुद्ध फौजदारी कारवाई

## १४ जणांविरोधात गुन्हा दाखल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसई विरार शहरात वाढत्या बेकायदा जाहिरातीमुळे शहराचे विद्रुपिकरण होत असताना पालिका केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने पालिकेच्या कारभारावर अनेकवेळा टीका केली जात होती. पण अखेर पालिकेने आता अशा बेकायदा जाहिराती करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू केले आहे.

त्यात पालिकेच्या प्रभाग समीती एफ मध्ये अशा एका बेकायदा जाहिरात फलकावर पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात फलकावर झळकलेल्या १४ जणांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रभाग समिती एफ चे प्रभारी सहायक आयुक्त शशीकांत पाटील यांनी हा गुन्हा दाखल केला आहे. पाटील यांनी माहिती दिली की, पेल्हार परिसरात असलेल्या नागोरी डेअरी येथील काठीयावाडी उपहार गृहाच्या समोर आणि इतर परिसरात ६ फलक लावण्यात आले होते.

या फलकावर अभिनंदनपर जाहिरात करण्यात आली होती. यासाठी फलक लावणाऱ्यांनी पालिकेची परवानगी घेतली नसल्याने फलकावरील १४ जणांच्या विरोधात महाराष्ट्र मालमत्तेच्या विद्रुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ प्रमाणे कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात कुणालाही अटक करण्यात आले नसल्याची माहिती पेल्हार पोलिसांनी दिली आहे.

पालिकेने कलेल्या या कारवाईचे कौतुक केले जात आहे. पालिकने शहरात इतर ठिकाणी अशी कारवाई करून बेकायदेशीर जाहिरातीवर लगाम लावावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



संग्रहित छायाचित्र

# श्रद्धा वालकरच्या वडिलांचा पुन्हा तुळींज पोलिसांवर आरोप

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** श्रद्धा वालकरचे वडील विकास वालकर यांनी पुन्हा एकदा तुळींज पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीवर आरोप केले आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये तुळींज पोलिसांनी कारवाई केली असती तर श्रध्दा जिवंत असती याचा पुनरूच्चार त्यांनी केला. या संदर्भात चौकशी करावी अशी मागणी करण्यासाठी त्यांनी शुक्रवारी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांची भेट घेतली.

वसईत राहणाऱ्या श्रद्धा वालकरची तिचा प्रियकर आफताब पुनावाला याने दिल्लीत हत्या केली होती. आफताब तिला मारहाण करत होता. त्याच्यापासून जीवाला धोका आहे अशी तक्रार श्रद्धाने नोव्हेंबर २०२० मध्ये तुळींज पोलीस ठाण्यात दिली होती. आयुक्त पांडे यांनी देखील चौकशी करण्याचे आश्वासन दिले. यावेळी भाजप नेते किरीट सोमय्या उपस्थित होते.

म. टा. पा. नं. ५.

# अवमान, सीमाप्रश्न गाजणार

## विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात

Sanjay.vhanmane
@timesgroup.com
@sanjayvMT



मटा विशेष

**मुंबई :** सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून महापुरुषांबद्दल वारंवार होणारी अवमानकारक वक्तव्ये, राज्यातील मंत्र्यांकडूनच महिलांबाबत काढलेले अनुद्गार, सीमाप्रश्नावरून कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी केलेली वादग्रस्त विधाने, राज्यातील उद्योग परराज्यांत विशेषतः गुजरातकडे जाणे, यांसारख्या मुद्द्यांबरोबरच वाढती महागाई आणि बेरोजगारी अशा सर्व प्रश्नांवरून सोमवारी, १९ डिसेंबरपासून नागपूरमध्ये पार पडणारे हिवाळी अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. त्यात मुंबईत महाविकास आघाडीने राज्य सरकारविरोधात एकत्रित मोर्चाचे आयोजन करत अधिवेशनात आक्रमक होण्याचे संकेत दिले. त्यामुळे सत्ताधारी पक्षासाठी हे अधिवेशन हे एक प्रकारे तारेवरची कसरत ठरणार आहे.

करोनामुळे सलग दोन वर्षे नागपूरला हिवाळी अधिवेशन होऊ शकले नव्हते. आता करोनाची साथ नियंत्रणात आल्याने नागपूर अधिवेशनासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षात उत्साह आहे. अधिवेशनाची तयारी पूर्ण झाली असून मंत्री, आमदार आणि अधिकारी यांच्या स्वागतासाठी संत्रानगरी सज्ज झाली आहे. पोलिस प्रशासनाने विधानमंडळ परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यासाठी राज्यभरातील पोलिस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना तैनात केले आहे. या अधिवेशनासाठी विरोधकांकडे बरेच मुद्दे आहेत. गेल्या महिन्यात कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी अनुद्गार काढल्याने राज्यातील वातावरण तापले असताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले. यामुळे संतापात भर पडली. विरोधी पक्षांसह सत्ताधारी भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी राज्यपालांना हटविण्याची मागणी केली. त्यावर राज्यपालांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून सारवासारव करण्याचा प्रयत्न केला असला, तरी राज्यपालांच्या राजीनाम्याची मागणी विरोधक लावून धरणार आहेत. राज्यपालांच्या पाठोपाठ भाजपचे विधान परिषद सदस्य प्रसाद लाड, पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही महापुरुषांबद्दल अनुद्गार काढले. त्यामुळे या सर्व प्रकरणांवरून अधिवेशनात संबंधित मंत्र्यांना, तसेच सरकारला धारेवर धरण्याची विरोधकांनी तयारी केली आहे.

सीमाप्रश्नावरून कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी केलेल्या वक्तव्यावरून सीमाप्रश्नाची धग अधिकच वाढली. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून अरेरावी सुरू असताना त्याला महाराष्ट्राने प्रत्युत्तर दिले नाही. या प्रश्नावर विरोधी पक्ष सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही आक्रमक राहणार आहे. विरोधकांची कोंडी करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सीमाप्रश्नावर ठराव मांडण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात होऊ घातलेले लाखो कोटी रुपये गुंतवणुकीचे प्रकल्प गुजरातला गेले. त्यातही वेदान्त फॉक्सकॉन प्रकल्पावरून आरोप-प्रत्यारोपांच्या जोरदार फैरी झडल्या. या मुद्द्यावरूनही विरोधी पक्षाने सरकारला अधिवेशनात धारेवर धरण्याचा निर्धार केला आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या चहापानाकडे पाठ?

राज्यातील महत्त्वाच्या प्रश्नावर शिंदे सरकार निष्क्रिय असल्याची टीका करणारा विरोधी पक्ष रविवारी सायंकाळी होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या चहापानाकडे पाठ फिरविण्याचीच अधिक शक्यता आहे. प्रथेप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधी पक्षाला चहापानाचे निमंत्रण दिले जाईल. मात्र, विरोधी पक्ष हे निमंत्रण नाकारून चहापानावर बहिष्कार टाकण्याची शक्यता असून तशी घोषणा रविवारी त्यांच्याकडून होऊ शकते.